सत्यमेव जयते

साप्ताहिक

# दिव्य आधार

https://epaper.divyaaadhar.com

rizwanshaikhekmat33@gmail.com

संपादक : शेख रिजवान मो. 9561840184



ग्राऊंड रिपोर्टींग
पान ४ वर

बीड वर्ष १३ वे, अंक ०५, सोमवार, दि. ६ ऑक्टोबर २०२५RNI/MAHMAR/2013/54433 पाने–४ किंमत १ रुपया

# शिक्षणविभागाच्या नाकावर टिच्चून अनाधिकृत भागशाळांचा बाजार भरलेलाच

**बीड । दिव्य रिपोर्टर**

मागील अनेक वर्षांपासून शहरातील बालेपीर, भालदारपुरा व गांधीनगर परिसरात शिक्षणसंस्थेच्या अनाधिकृत भागशाळा सुरू आहेत. तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी या भागशाळांची तपासणी केल्यानंतर या भागशाळा अनाधिकृत असल्याचा अहवाल दिला होता. तसेच या अनाधिकृत भागशाळात शिकविणाऱ्या शिक्षकांचा पगारही बंद करण्याचे त्या तपासणी पत्रकात नमूद आहे. तसेच मिळालेल्या माहितीनुसार जर या भागशाळा अशाच प्रकारे सुरू राहिल्या तर प्रतिदिवसा प्रमाणे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी असे आदेशही निघाल्याचे समजले असून जर शिक्षण विभागाने प्रति दिवसाप्रमाणे या अनाधिकृत भागशाळांवर दंडात्मक कारवाई केली असती तर शिक्षण विभागाला कोट्यवधी रुपये दंडरूपी महसूल मिळाला असता. परंतु शिक्षण विभागाच्या काही अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने या अनाधिकृत भागशाळा शिक्षणविभागाच्या नाकावर टिच्चून आजही सुरू असून शिक्षण विभाग मात्र या अनाधिकृत भागशाळांवर कारवाई करण्यासाठी का घाबरत आहे? याचेही कारण शोधणे गरजेचे आहे.

**भालदारपुरा, बालेपीर या परिसरात सुरू असलेल्या अनाधिकृत भागशाळा शिक्षक विभागातील अधिकाऱ्यांना का दिसून येत नाहीत? शिक्षण संचालकांनी आता या अधिकाऱ्यांचीच चौकशी करणे गरजेचे**

**पूर्वी या अनाधिकृत भागशाळांवर दंडात्मक कारवाईचे आदेश निघाल्याची मिळाली माहिती, जर शिक्षणविभागाने नियमाने दंडात्मक कारवाई केली असती तर कोट्यवधी रुपयांचा दंडरूपी महसूल शिक्षणविभागाला मिळाला असता.**

बालेपीर, भालदारपुरा या परिसरात काही शिक्षणसंस्थेच्या भागशाळा आजही सुरू आहेत. या भागशाळा अनाधिकृत असल्याचा तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांचा अहवाल असतानाही शिक्षणविभागाच्या अधिकाऱ्यांना या अनाधिकृत भागशाळा सुरू असलेले का दिसून येत नाही? यासाठी आता शिक्षणसंचालक स्तरावर या अधिकाऱ्यांचीच (पान २ वर)

## बालेपीर व भालदारपुरा शाळांना युडाईज नंबर नाही तर मग शिक्षणविभाग कारवाई का करत नाही?

तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी बालेपीर, भालदारपुरा व गांधीनगर परिसरातील भागशाळा अनाधिकृत असल्याचा अहवाल २०१० साली दिला होता. त्यानंतरही या अनाधिकृत भागशाळा आजही सुरू आहेत. तसेच गटशिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार काही दिवसांपूर्वी गांधीनगर परिसरातील सुरू असलेली भागशाळा बंद करण्यासाठी पत्रव्यवहार केलेला आहे. परंतु बालेपीर व भालदारपुरा येथील भागशाळा आजही सर्रास सुरू आहेत. विशेष म्हणजे शाळा तपासणीसाठी पथक गेल्यानंतर या शाळांना युडाईज नंबरच नाही तर मग या अनाधिकृत भागशाळा कोणत्या आधारावर सुरू आहेत? या दृष्टीकोनातून शिक्षणविभागाच्या अधिकाऱ्यांना या अनाधिकृत भागशाळांना कुलूप लावता येईल परंतु सिस्टिम मॅनेज असल्याने या कारवाया होत नसल्याची शंका असून आता शिक्षणसंचालकांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

# त्या जीवघेण्या सिरपचा तात्काळ वापर थांबविण्याचे आदेश

## राज्यातील सर्व स्थानिक अधिकाऱ्यांना सूचना

### जर सदरील बॅचचे सिरप कुठे आढळून आल्यास तात्काळ ड्रग्स कंट्रोलर यांना संपर्क करण्याचे आवाहन

**बीड । दिव्य रिपोर्टर**

मध्यप्रदेश आणि राजस्थानमध्ये त्या सिरपमुळे काही मुले मृत्यूमुखी पडली. त्यानंतर त्या दोन्ही राज्यातील त्या सिरपचे विक्री व वापर तात्काळ थांबविण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्र राज्यशासनाने महत्त्वाचा निर्णय घेत रविवारी सायंकाळी प्रेसनोट काढून राज्यातील सर्व स्थानिक अधिकाऱ्यांना ते जीवघेणे सिरप जर महाराष्ट्र राज्यात कुठे असेल तर त्याचा वापर तात्काळ थांबविण्यात यावा अशा सूचना दिल्या असून जर कुठे सदरील बॅचचे सिरप आढळून आल्यास ड्रग्स कंट्रोलर डी.आर.गहाणे यांच्याशी संपर्क



करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सदरील लहान मुलाचे सिरप हे भेसळयुक्त असल्याने मध्यप्रदेश व राजस्थान या राज्यात काही मुलांना त्या सिरपमुळे आपले प्राण गमवावे लागले. सदरील सिरप भेसळयुक्त असल्याचे निदर्शणास आल्यानंतर त्या राज्यात त्या सिरपच्या वापरावर बंदी आणण्यात आली आहे. रविवारी सायंकाळी महाराष्ट्र राज्याचे ड्रग्स कंट्रोलर डी.आर.गहाणे यांनी प्रेसनोट काढून राज्यातील सर्व स्थानिक अधिकाऱ्यांना सुचना दिल्या की, सदरील बॅचचे तामिळनाडू राज्यातील कंपनीत तयार झालेले जे सिरप भेसळयुक्त असून त्या बॅचच्या सिरपचा तात्काळ वापर बंद करण्यात यावा तसेच सदरील सिरप औषध दुकान किंवा शासकीय रुग्णालयात आढळून आल्यास ड्रग्स कंट्रोलर डी.आर.गव्हाणे यांच्याशी संपर्क साधण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

### जनतेने थेट तक्रार करावी

तामिळनाडू राज्यात उत्पादित झालेले लहान मुलांचे त्या बॅचचे सिरप जर कोठे विक्री होत असेल किंवा त्याचा वापर होत असेल तर जनतेने याची थेट तक्रार ड्रग्स कंट्रोलर डी.आर.गव्हाणे यांच्या संपर्क क्रमांक ९८९२८३२२८९ या क्रमांकावर करावी. तसेच राज्यातील स्थानिक अधिकाऱ्यांनी या सिरपचा वापर होवू नये याची दक्षता घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# वक्फमंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांचा पुरग्रस्तांच्या मदतीसाठी पुढाकार

## जमियत उलमा यांच्या उपस्थितीत पुरग्रस्तांना मदत वितरित;१८ कुटुंबीयांना मिळाला दिलासा, वक्फमंडळाची ऐतिहासिक कामगिरी

**बीड । दिव्य रिपोर्टर**

बीड जिल्ह्यासह शहरात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीत शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांना याचा फटका बसला आहे. शहरातील काही जुनी घरे पडून अनेकांचे संसार उघड्यावर पडले तर अनेक जण यात जखमी झाले. या पुरग्रस्तांच्या मदतीसाठी विविध संघटना व समाजसेवकांनी मदतीसाठी पुढाकार घेतला. परंतु यंदा वक्फमंडळाने ऐतिहासिक कामगिरी करत शहरातील अठरा पूरग्रस्त पिडितांना आर्थिक मदत करून मोठा दिलासा दिला. विशेष म्हणजे वक्फमंडळाने असे कार्य पहिल्यांदाच केले याचे सर्व श्रेय वक्फमंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांनाच जाते. शनिवारी सायंकाळी आडत



मार्केट परिसरात जमियत उलमाचे जाकीर सिद्दिकी, मौलाना बाखी, मोईन मास्टर, हाश्मी सर, फारूक पटेल, ॲड.शेख शफीक, खुर्शीद आलम, अब्दुल रहीम यांच्यासह आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पुरग्रस्तांना ही आर्थिक मदत देण्यात आली.

वक्फमंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांनी अध्यक्षपदाचा पद्भार घेतल्यानंतर वक्फमंडळातून अनेक उल्लेखनिय कामे होत आहेत. पुरग्रस्तांच्या मदतीसाठी वक्फमंडळाने पुढाकार घेतल्याने त्यांच्या या उल्लेखनिय कामगिरीची जिल्ह्यासह राज्यभरात चर्चा असून वक्फमंडळाने पुरग्रस्त १८ पिडीत कुटुंबीयांना प्रत्येकी २० हजार रुपयांची आर्थिक मदत देवून ऐतिहासिक कामगिरी केली. सदरील कार्य जमियत उलमा यांच्या उपस्थितीत पार पडले. शनिवारी सायंकाळी पिडितांना मदत पुरवविण्यासाठी शहरातील आडत मार्केट परिसरात छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला शहरातील मान्यवरांसह अनेक समाजसेवकांची विशेष उपस्थिती होती. यात अठरा पुरग्रस्त पिडित कुटुंबीयांना आर्थिक मदत देवून वक्फमंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांनी मोठा दिलासा दिला. यावेळी पिडितांच्या चेहऱ्यावर हसु फुलले.

### समीर काझी यांनी वक्फमंडळाची कायापालट केली

बीड जिल्हाच नव्हे तर राज्यातील वक्फबोर्ड कार्यालयाची अवस्था अत्यंत बिकट झाली होती. वक्फमंडळाच्या जमिनीवर अतिक्रमण करणे असे प्रकार सर्रास सुरू होते. तसेच वक्फमंडळाने कधीही कोणाच्या मदतीसाठी धाव घेतली नव्हती. परंतु वक्फमंडळाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी समीर काझी यांनी स्विकारल्यानंतर वक्फमंडळाची कायापालट तर झालीच शिवाय गरजूंना मदतीसाठीही समीर काझी यांनी विशेष पुढाकार घेवून वक्फमंडळाच्या वतीने वरील प्रमाणे तरतूद केली.

# चलनभरणा पत्रावर केज तहसीलदार यांची बनावट स्वाक्षरी करणाऱ्यांना प्रशासनाकडून अभय

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना माहिती देवूनही संबंधितांवर कोणतीच कारवाई नाही



**बीड । दिव्य रिपोर्टर**

केज तहसीलदार यांच्या बनावट स्वाक्षरीचे चलनभरणा पत्र तयार करून त्या बनावट पत्राच्या आधारावर दोन जमिनीची रजिस्ट्री करण्यात आली. चलनभरणा पत्रावरील तहसीलदार यांची स्वाक्षरी बनावट असल्याचे निदर्शणास आल्यानंतर ते खरेदीखत रद्द करण्यासंदर्भात प्रशासनाने योग्य कारवाई केली. परंतु तहसीलदार यांच्यासारख्या वरिष्ठ अधिकाऱ्याची बनावट स्वाक्षरी करणारे कोण? प्रशासन मात्र याचा शोध घेत नसल्याने प्रशासनच दोषींना अभय देत असल्याचे दिसून येत असून तहसीलदार, सहदुय्यम निबंधक याप्रकरणी का गप्प आहेत? याचीही चौकशी करणे गरजेचे आहे.

**केज तहसील कार्यालयातून झालेली इतर बोगसगिरी बाहेर येईल या धास्तीने केज तहसीलदार बोगस स्वाक्षरी प्रकरणी गप्प असल्याचा संशय तर सहदुय्यम निबंधक अधिकारीही या प्रकरणी चौकशीच्या फेऱ्यात**

केज तहसीलदार यांची बनावट स्वाक्षरी करून चलनभरणा पत्र तयार केले. विशेष म्हणजे त्या बनावट पत्रामुळे केज तहसीलचा महसूलही बुडाला. बनावट पत्राच्या आधारावर दोन जमिनीची खरेदी-विक्री झाली. अशाप्रकारे बोगसगिरी करणाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज असतानाही केज तहसीलदार व केज सहदुय्यम निबंधक ▶▶ पान २ वर...

### जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी लक्ष देणे गरजेचे

केज तहसीलदार यांच्या बनावट स्वाक्षरीने चलनभरणा पत्र तयार करून त्या चलनभरणा पत्राच्या आधारे केज सहदुय्यम निबंधक यांनी दोन जमिनीची रजिस्ट्री करून दिली. केज तहसीलदार यांनी सदरील खरेदीखत रद्द करण्यात यावे असा पत्रव्यवहार केला. परंतु बनावट स्वाक्षरी करणारे कोण? यांच्यावर केज प्रशासनाने कोणतीच कारवाई केली नाही, मिळालेल्या माहितीनुसार या बोगसगिरीत केज तहसील कार्यालयातील काही कर्मचारी सामील असल्याची शंका असून त्या कर्मचाऱ्यांचे नावे पुढे आली तर आपल्या विभागाची बदनामी होईल या हेतूने केज तहसीलदार या प्रकरणी दोषींना अभय देत असल्याचा संशय व्यक्त केला जात असून जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणाकडे लक्ष देण्याची गरज आहे.

# इमारतीचे स्ट्रक्चर ऑडीट न करता लिफ्टच्या कामासाठी ७० लाख रुपयांचा प्रस्ताव मंजूर करणे कितपत योग्य?

## लिफ्ट सुरू करण्याची महावितरणकडून परवानगी घेतली होती का?

**कार्यकारी अभियंता, उपअभियंता व शाखा अभियंता यांच्याकडून या प्रकरणी मौन धारण**

बीड । दिव्य रिपोर्टर

नगर रोडवरील कौटुंबिक न्यायालयाच्या इमारतीला लिफ्ट बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदरील लिफ्टसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने ७० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. यात लिफ्टच्या फौंडेशनसाठी २० लाख रुपये व लिफ्ट बसविण्यासाठी ५० लाख रुपये अशी तरतूद करण्यात आलेली आहे. विशेष म्हणजे कौटुंबिक न्यायालयाची इमारत ही अंदाजे १९८० च्या दशकात तयार झालेली आहे. सदरील इमारत बांधून अंदाजे ४० ते ४५ वर्षे झालेले दिसून येते. अशा जुन्या इमारतीला लिफ्ट बसविणे योग्य आहे का? हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असून लिफ्ट बसविणे योग्य असले तरी त्या इमारतीचे स्ट्रक्चर ऑडीट ▶▶ पान २ वर...

### लिफ्ट बसविण्यासाठी महावितरण कंपनीची परवानगी गरजेची

मध्यंतरी शहरातील एका हॉस्पिटलची लिफ्ट तुटून खाली पडली. यात संघर्षयोद्धा जरांगे पाटील बालंबाल बचावले. या घटनेनंतर शहरातील अनेक खासगी लिफ्टला महावितरणची परवानगी नसल्याचे समोर आले. लिफ्ट बसविण्यासाठी नियमाने महावितरण कंपनीची परवानगी किंवा नाहरकत प्रमाणपत्र घेणे अपेक्षित आहे. एक तर कौटुंबिक न्यायालयाची इमारत ही खुप जुनी आहे. अशा जुन्या इमारतीला लिफ्ट बसविण्यापूर्वी त्या इमारतीचे स्ट्रक्चर ऑडीट करणे तसेच महावितरणची परवानगी घेवूनच इमारतीला लिफ्ट बसविणे हे योग्य वाटते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी लिफ्ट कामासाठी अंदाजपत्रक तयार करण्यापूर्वी त्या इमारतीचे स्ट्रक्चर ऑडीट व लिफ्ट बसविण्याची परवानगी घेणे गरजेचे होते. जर स्ट्रक्चर ऑडीट झाले असेल आणि लिफ्ट बसविण्याची महावितरणकडून परवानगी घेतली असेल तर योग्य.

# आरोग्य विभागातील स्वच्छता कंत्राटी कर्मचाऱ्यातही मोठी बोगसगिरी ?

## अनुपस्थित स्वच्छता कंत्राटी कर्मचाऱ्यांचा पगार उचलण्याचा फंडा सुरू असल्याची शंका

**बीड । दिव्य रिपोर्टर**

जिल्हा आरोग्य विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील ॲम्बुलन्स चालविण्यासाठी व प्राथमिक आरोग्य केंद्राची स्वच्छता करण्यासाठी कर्मचाऱ्याची नेमणूक करण्याची जबाबदारी एका एजन्सीला टेंडरद्वारे देण्यात आली होती. त्याअनुषंगाने संबंधित एजन्सीने कंत्राटी चालक व कंत्राटी स्वच्छता कर्मचारी पुरवठा केलेले आहेत. परंतु संबंधित एजन्सी या चालकांना व स्वच्छता कर्मचाऱ्यांना ठरल्याप्रमाणे पगार देत नसल्याने त्यांच्या पगारीत मोठ्या प्रमाणात घोळ झाल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे

**जिल्हा आरोग्य प्रशासनाकडे कंत्राटी ॲम्बुलन्सचालक व स्वच्छता कर्मचाऱ्यांची यादीच नाही, सर्व प्रकार संशयास्पद**

**त्या एजन्सीचे कंत्राट संपले तरीही कर्मचारी कामावर तर मग पगार कोण देणार? जानेवारी महिन्यांपासून कर्मचाऱ्यांचे पगार रखडलेले, उपासमारीची वेळ**

याप्रकरणी संबंधित चालक व स्वच्छता कर्मचारी यांनी वारंवार तक्रार करूनही त्यांना नियमाने मिळणारी पगार देण्यात येत नाही. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रावर काही स्वच्छता कर्मचारी स्वच्छतेचे काम करतही नाही. ते अनुपस्थित असतात. असे असतानाही त्यांचा पगार उचलण्यात येत असल्याची शंका असून एकंदरीत त्या एजन्सीची व काही खासगी एजंटांची उच्चस्तरीय चौकशी करणे गरजेचे झाले आहे.

काही महिन्यांपूर्वी ज्या एजन्सीला कंत्राटी कर्मचारी पुरवठा करण्याचे टेंडर मिळाले होते ते टेंडर संपले तरीही प्राथमिक आरोग्य केंद्रावर चालक व स्वच्छता कर्मचारी कार्यरत आहेत. मागील अनेक महिन्यांपासून चालक व स्वच्छता कर्मचारी यांचा पगार रखडलेला असून जर त्या एजन्सीचे टेंडर संपले आहे तर आता या कर्मचाऱ्यांचा पगार कोण देणार? हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत असून मिळालेल्या माहितीनुसार काही स्वच्छता कर्मचारी प्राथमिक आरोग्य केंद्रावर कामावर अनुपस्थित असतात. परंतु त्या अनुपस्थित कर्मचाऱ्यांचा पगार काढला जातो? अशी माहिती मिळाली असून या मागचे सत्य काय? याचा ▶▶ पान २ वर...

### आरोग्य प्रशासनाकडे या कर्मचाऱ्यांची यादी का नाही?

कंत्राटी चालक व कंत्राटी स्वच्छता कर्मचारी एजन्सीकडून पुरवठा होत असले तरी हे चालक व स्वच्छता कर्मचारी आरोग्य प्रशासनाकडे कार्यरत आहेत. जिल्ह्यात ५२ प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. त्या अनुषंगाने ५२ स्वच्छता कर्मचारी कार्यरत असावेत. हे कर्मचारी कोणत्या प्राथमिक आरोग्य केंद्रावर कार्यरत आहेत, त्यांचे सर्व डिटेल्स आरोग्य विभागाकडे असणे अपेक्षित आहे. तसेच कोणत्या प्राथमिक आरोग्य केंद्रावर कोणते चालक ॲम्बुलन्स चालवितात याचाही आढावा आरोग्य प्रशासनाने घेणे गरजेचे आहे. परंतु जिल्हा आरोग्य अधिकारी स्पष्ट सांगतात की, आमच्याकडे यांची यादी उपलब्ध नाही. जरी हे कर्मचारी तालुकास्तरावर कार्यरत असतील तरी जिल्हा स्तरावर यांची माहिती असणे आवश्यक आहे. हा सर्व प्रकार संशयास्पद वाटत असून यामागचे कारण शोधण्याची गरज आहे.

### अनुपस्थित कर्मचाऱ्यांचा पगार निघत असल्याची चर्चा

जिल्ह्यातील ५२ प्राथमिक आरोग्य केंद्रावर कंत्राटी स्वच्छता कर्मचारी नियुक्त आहेत. परंतु यातील अनेक स्वच्छता कर्मचारी प्राथमिक आरोग्य केंद्रावर अनुपस्थित असल्याची चर्चा असून हे स्वच्छता कर्मचारी अनुपस्थित असतानाही त्यांचा वेळोवेळी पगार काढला जात असल्याचीही चर्चा जोरात आहे. जर हे कर्मचारी कामावरच नाही तर यांचा पगार कोणाच्या घशात जातो? याचाही तपास करण्याची गरज आहे. काही अनुपस्थित स्वच्छता कर्मचारी यांची उपस्थिती दाखवून त्या अनुपस्थित कर्मचाऱ्यांना काही टक्केवारी देवून उर्वरित रक्कम काही एजंट व संबंधित एजन्सी गिळंकृत करत असल्याची शंका असून जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी या प्रकरणाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच या षडयंत्रात जिल्हा आरोग्य विभागातील काही कर्मचारी सामील असल्याचाही संशय व्यक्त केला जात आहे.

# पान १ वरून

### आरोग्य विभागातील स्वच्छता

आरोग्य प्रशासनाने आढावा घेण्याची गरज आहे. मागील अनेक दिवसांपासून दिव्य आधार या कर्मचाऱ्यांच्या प्रश्नासाठी पाठपुरावा करत आहे. आरोग्य विभागात किती ॲम्बुलन्सचालक कंत्राटी पद्धतीने कार्यरत आहेत? तसेच किती स्वच्छता कर्मचारी प्राथमिक आरोग्यकेंद्रात कार्यरत आहेत? याची जिल्हा आरोग्य अधिकारी उल्हास गंडाळ यांच्याकडे संबंधित कर्मचाऱ्यांची यादीची मागणी केली असता त्यांच्याकडे स्वच्छता कर्मचारी व चालकांची यादी उपलब्ध नसल्याने हा सर्व प्रकार संशयास्पद वाटत असून जिल्हा आरोग्य विभागातील काही कर्मचारी त्या एजन्सीला मॅनेज असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी केली तर कोट्यवधी रुपयांचा घोटाळा बाहेर निघण्याची शक्यता दर्शवली जात आहे.

### चलनभरणा पत्रावर केज

अधिकारी अशा दोषींना पाठिशी घालत असल्याने या प्रकरणी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी लक्ष घालावे व कारवाई करावी अशी मागणी केल्यानंतरही जिल्हाधिकारी कारवाई करत नसतील तर जिल्हा प्रशासन अशा दोषींना अभय देत आहे असेच म्हणावे लागेल. तसेच सदरील चलनभरणा पत्रावरील स्वाक्षरी बनावट असल्याचे केज सहदुय्यम निबंधक यांच्या निदर्शणास ही बाब आली. त्यांनी केज तहसीलदार यांना बनावट स्वाक्षरी प्रकरणी कल्पना दिली. त्याअनुषंगाने ते बनावट चलनभरणा पत्राद्वारे झालेले खरेदीखत रद्द करण्यासंदर्भात संबंधितांनी पत्रव्यवहार केला परंतु अशाप्रकारे वरिष्ठ अधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी करणारे कोण? याचा शोध मात्र केज प्रशासन घेत नाही. या सर्व बाबी संशयास्पद वाटत असून मिळालेल्या माहितीनुसार केज तहसील कार्यालयातून मोठ्या प्रमाणात इतर बोगसगिरी झालेली असावी असा संशय असून ती बोगसगिरी बाहेर येईल या धास्तीने केज तहसीलदार बनावट स्वाक्षरी प्रकरणी गप्प असल्याचे दिसून येत असून सहदुय्यम निबंधक अधिकारीही दोषींकडे दुर्लक्ष करत असल्याने केज तहसीलदार व सहदुय्यम निबंधक अधिकारी हे येत्या काळात चौकशीच्या फेऱ्यात येतील यात काही शंका नाही.

### शिक्षणविभागाच्या नाकावर

चौकशी करणे गरजेचे झाले असून दिव्य आधार या प्रकरणाचा गेल्या अनेक महिन्यांपासून पाठपुरावा करत आहे. विशेष म्हणजे या अनाधिकृत भागशाळा सुरू असल्याचे चित्रीकरण करून गटशिक्षणाधिकारी यांनाही दाखविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने गटशिक्षणाधिकारी यांनी काही शिक्षणसंस्थेच्या मुख्याध्यापकांना नोटीस पाठवून या भागशाळा कोणत्या आधारे सुरू आहेत याचा अहवालही मागविलेला आहे. परंतु संबंधित मुख्याध्यापकांनी गटशिक्षणाधिकारी यांच्या त्या नोटीसला केराची टोपली दाखवून अद्यापपर्यंत त्या अनाधिकृत शाळांचे कागदपत्र दाखल केलेले नाही. यात विशेष म्हणजे शाळा तपासणीसाठी गटशिक्षणाधिकारी, शिक्षणविस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, साधनव्यक्ती असे विविध पदाधिकारी यांची नेमणूक आहे. परंतु त्यांना या भागशाळा का दिसून येत नाही हा खऱ्या अर्थाने चौकशीचा भाग आहे.

### इमारतीचे स्ट्रक्चर ऑडीट न

करूनच लिफ्ट बसविणे योग्य वाटते. तसेच लिफ्ट बसविण्यासाठी नियमाने महावितरण कंपनीची परवानगी घेणे अपेक्षित आहे. या प्रकरणी प्रतिनिधीने कार्यकारी अभियंता तोंडे, उपअभियंता बोराडे व शाखा अभियंता भागवत यांना विचारणा केली. परंतु या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणी मौन धारण केल्याने इमारतीचे स्ट्रक्चर ऑडीट झाले नसल्याचे दिसून येत असून एकंदरीत या लिफ्टच्या कामाची व लिफ्टच्या अंदाजपत्रकाची थर्ड पार्टीमार्फत चौकशी करणे योग्य वाटत आहे.

सदरील लिफ्टच्या फाऊंडेशनचे काम सुरू असताना संबंधित गुत्तेदाराने वाळूऐवजी लिफ्टच्या कामासाठी कचखडीचा वापर केला. नियमाने कचखडी धुवून वापरणे बंधनकारक असताना संबंधित गुत्तेदाराने बुकट्याच्या फुपाट्यासहीत कचखडी वापरली. या प्रकरणी प्रतिनिधीने कार्यकारी अभियंता, उपअभियंता व शाखाअभियंता यांना या कामाचे व्हिडिओ चित्रीकरण करून बुकट्यासहीत कचखडी वापरत असल्याची बाब निदर्शणास आणून दिली. तसेच लिफ्टच्या कामासाठी ७० लाखांचे अंदाजपत्रक हे संशयीत असून एकंदरीत या कामात मोठा घोळ झाल्याचे दिसून येत असल्याने या कामाची थर्ड पार्टीमार्फत चौकशी करावी अशी वारंवार मागणी करूनही सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी याकडे दुर्लक्ष का करत आहे? हे मात्र समजून येत नाही. तसेच कौटुंबिक न्यायालयाची इमारत ही जुनी आहे. सदरील इमारतीचा वापर करणे योग्य आहे का? तसेच इमारतीला लिफ्ट बसविणे योग्य आहे का? यासाठी या इमारतीचे स्ट्रक्चर ऑडीट करणे गरजेचे आहे. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्ट्रक्चर ऑडीट न करताच या इमारतीच्या लिफ्ट कामासाठी ७० लाख रुपयांचा निधी मंजूर करणे कितपत योग्य आहे. या सर्व बाबींची चौकशी करणे गरजेचे असून या लिफ्टच्या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांचीही उच्चस्तरीय चौकशी करणे गरजेचे वाटत आहे.

# ताईंच्या विचाराचं सोनं लुटण्यासाठी इर्शाद भैय्या शेख २५ गाड्यांच्या ताफ्यासह मुस्लिम बांधवाना घेऊन दसरा मेळाव्यात हजर

**बीड । दिव्य रिपोर्टर**

दसरा म्हणजे विचाराचं सोनं लूटण्याचा सोनेरी दिवस, सत्याचा असत्यावरचा विजय साजरा करण्याचा दिवस. या दिवसाला हिंदू संस्कृतीत अनन्य साधारण महत्व आहे. पण ह्या हिंदू संस्कृतीच्या विशेष दसरा सणाच्या दसरा मेळाव्यात एक मुस्लिम व्यक्ती आपल्या मुस्लिम समाजाच्या शेकडो नागरिकांसह या दसरा मेळाव्यात हजर राहिला तर ही नुसती कल्पना सुद्धा तुम्हाला धक्का देऊन जाईल. पण ही घटना प्रत्यक्षात घडली आहे ती लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या सावरगाव घाट येथे पार पडलेल्या भव्य दिव्य दसरा मेळाव्यात. परवा २ सप्टेंबर रोजी अवघ्या भारत देशात विजया दशमी अर्थात '' दसरा '' हा सण साजरा झाला. बीड जिल्ह्यात दसरा हा सण विशेष करून '' दसरा मेळाव्याने '' साजरा होत आला आहे. स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांचा सावरगाव घाट येथील गडावरील दसरा मेळावा उभ्या महाराष्ट्र राज्याला परिचित आहे. स्वर्गीय गोपीनाथराव मुंडेच्या नंतर त्यांची जेष्ट कन्या तथा लोकनेत्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे ह्या. स्वर्गीय गोपीनाथराव मुंडेने सुरु केलेली

'' दसरा मेळाव्या'' ची पावन परंपरा समर्थ पणे चालवत आहेत. यंदाचा दसरा मेळावा २ ऑक्टोंबर रोजी पार पडला, आपल्या स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांवर आणी साहेबांच्या जेष्ट कन्या '' पंकजाताई मुंडे '' यांच्यावर अस्सीम प्रेम करणारे नागरिक या दसरा मेळाव्यास लाखोंच्या संख्येत मोठ्या श्रद्धेने हजर होते. मात्र यंदाच्या दसरा मेळाव्यात संपूर्ण उपस्थित



नागरिकांचे लक्ष वेधून घेतले ते, एका तरुण मुस्लिम व्यक्तीच्या येण्याने. हा तरुण मुस्लिम समोर एका दृढ निश्चियाने चालत होता आणी त्याच्या पाठी शेकडो मुस्लिम नागरिक या दसरा मेळाव्यात सामील होत होते. कोण आहे हा व्यक्ती? बघता क्षणी मुस्लिम समाजाचा आहे हे तर लक्षात येत होते. परंतु मुस्लिम समाजाच्या ह्या म्होरक्या आणी त्याच्या मागे असणाऱ्या या इतर शेकडो मुस्लिम दिसणाऱ्या व्यक्तींचं या दसरा मेळाव्यात काम तरी काय? कारण हा दसरा सण अथवा दसरा मेळावा तर विशेष करून हिंदू धार्मियांचा सण. मग या दसरा मेळाव्यात ह्या गैर हिंदू असणाऱ्या मुस्लिमांच काय काम? असे एक ना शेकडो प्रश्न उपस्थितांना पडले होते. कोण आहे नेमका हा व्यक्ती? तर या प्रश्नाच उत्तर आहे ''इर्शाद भैया शेख''. होय इर्शाद भैय्या शेख, भाजपा पक्षाच्या अल्पसंख्यांक मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष इर्शाद भैय्या शेख हेच ते.जातीने अथवा धर्माने मुस्लिम परंतु आपल्या लाडक्या ताईंच्या '' पंकजाताई गोपीनाथराव मुंडे '' यांच्या मार्गदर्शक विचारांचं सोनं लुटण्यासाठी आलेला ताईंचा खंदा समर्थक. मी जातीने आणी धर्माने मुस्लिम असलो म्हणून काय झाले? स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे यांच्या विचारातून प्रेरित होऊन मी मुस्लिम असून देखील बि. जे. पी या पक्षात सच्चा कार्येकर्ता म्हणून काम करत आलो आहे. कारण मी मुस्लिम असून देखील मला गैर वागणूक तर कधीच मिळाली नाहीच. उलट सर्व धर्म समभाव असणारा हा पक्ष असून. माझ्या सारख्या मुस्लिम व्यक्तीला जिल्ह्याच्या अध्यक्ष पदावर बसवून सन्मान केला जातो हा खरं तर आमच्या साठी मानसन्मान आहे. आणी राहिला हिंदूंच्या दसरा मेळाव्यात मुस्लिमांचे काम काय? हा प्रश्न. तर हा दसरा मेळावा आमच्या लाडक्या पंकजाताईचा आहे. जात, पात, धर्म, पंथ तोडून विचारांचं सोनं लुटण्याचा सोनेरी क्षण आहे. आमच्या लाडक्या ताईवर आम्हा मुस्लिम बांधवांची अस्सीम श्रद्धा आहे. आणी आजचा सोनेरी दिवसाचे साक्षीदार होण्यासाठी मी आणी माझे हे शेकडो मुस्लिम बांधव आणी आमच्या सोबतीला मुस्लिम धर्माचे गुरु हे सुद्धा माझ्यासोबत ह्या दसरा मेळाव्यास श्रद्धेने हजर झाले आहोत.कारण आम्हाला जात, पंथ, आणी धर्माची दारे तोडून मानवता हा सर्व श्रेष्ठ धर्म पाळायचा आहे.आम्हाला हिंदू मुस्लिम एकतेचे नवे पर्व सुरु करायचे असून मला एकजूट, एकसंघ समाज व्हावा अशी इच्छा आहे. कारण जातीच्या पलीकडे ईश्वर, अल्लहाह ने एकच शिकवण आणी धर्म श्रेष्ठ सांगितलेला आहे आणी तो म्हणजे मानव धर्म. आणी त्यामुळे मी, माझे मुस्लिम बांधव आणी आमच्या धर्माचे गुरु हे आमच्या पंकजाताई मुंडेच्या या दसरा मेळाव्या साठी आलो आहोत.ताईंच्या ह्या दसरा मेळाव्यात कोण कोण्या जात, पात, धर्म, पंथाचा व्यक्ती आला आहे ह्याला महत्व नाही. कारण आम्ही ताईंच्या पाठी सदैव ह्या मुळे आहोत कि, स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे आणी त्यांच्या नंतर आमच्या लाडक्या ताईंनी कधीच जात, धर्म, पंथाचा तिरस्कार न करता, अठरा पगड जातीचं राजकारण नाही तर समाज कारण केलं आहे. त्यामुळे मी ह्या सुवर्ण क्षण असणाऱ्या पंकजा ताईंच्या दसरा मेळाव्यात आलो आहे. आणी सोबत माझे समाज बांधव सुद्धा हजर आहेत. अशी प्रतिक्रिया अल्पसंख्यांक मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष इर्शाद भैय्या शेख यांनी या दसरा मेळाव्या प्रसंगी व्यक्त केली.



बीड जिल्ह्याच्या भाग्यविधात्या,लोकनेत्या,माजी खासदार स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या १९ व्या पुण्यस्मरण दिनी त्यांच्या स्मृतिस्थळी सहकुटुंब जाऊन विनम्र आदरांजली अर्पण करताना रविंद्र क्षीरसागर, हेमंत क्षीरसागर, संतोष वाघमारे (लारा) आदींची उपस्थिती होती.

# चैन चोर गुंजाळ पोलीसांनी केला गजाआड

**बीड । दिव्य रिपोर्टर**

गर्दीचा फायदा घेऊन चैन चोरी करणाऱ्या गुंजाळ याला पोलीसांनी गजाआड केले आहे. त्याच्याकडून १ लाख ५२ हजार रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. नेकनूर पोलीस ठाण्यात दीपक नारायण जोगदंड (रा. बानगाव ) यांच्या फिर्यादीवरून सोन्याची चैन चोरी झाल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणातील आरोपीचा पोलीस शोध घेत होते. अखेर चैन चोरी प्रकरणी चैन चोर गुंजाळ (रा. माऊली नगर बीड)



याला पोलीसांनी गजाआड केले. त्याच्याकडून १ लाख ५२ हजार रूपयांची १२ ग्रॅम सोन्याची चैन हस्तगत करण्यात आली आहे. ही कारवाई पोउपनि श्रीराम खटावकर, पो.ह.दुबाले, मस्के, गायकवाड, सानप, अशफाक, परझणे, मांजरे यांनी केली. आरोपीला नेकनूर पोलीसांच्या स्वाधीन करण्यात आले.

# छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणाच्या दुरावस्थेविरोधात 'सत्याग्रह आंदोलन'

**नगरपरीषदेने राजकीय, सामाजिक आणि व्यावसायिक वापरावर प्रतिबंध घालावा**

**बीड । दिव्य रिपोर्टर**

बीड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण हे सध्या पूर्णपणे दुरावस्थेत गेले असून नगरपरिषद प्रशासनाचे त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे.



क्रीडांगण परिसरात ठिकठिकाणी गवत वाढले असून गुरे चरण्यासाठी येत आहेत. मैदानाचा वापर खेळांऐवजी राजकीय, सामाजिक व व्यावसायिक कार्यक्रमांसाठी केल्याने चिखल आणि वाहनांच्या चाकांच्या खुणा पडल्या आहेत. त्यामुळे सकाळी व सायंकाळी मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे क्रिडांगणाचा राजकीय, सामाजिक आणि व्यावसायिक वापरासाठी प्रतिबंध घालण्यात यावा अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नगरविकासमंत्री एकनाथजी शिंदे,पालकमंत्री बीड अजितदादा पवार,क्रिडामंत्री माणिकराव कोकाटे यांना डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.याशिवाय ओपन जिममधील साहित्याची मोडतोड झाल्याने ते निष्क्रिय झाले असून, त्याकडेही प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. त्यामुळे मैदानात सुरक्षारक्षक नेमावा, ओपन जिम साहित्याची तात्काळ दुरुस्ती करावी, आणि क्रीडांगणाचा वापर खेळांच्या व्यतिरिक्त राजकीय, सामाजिक व व्यावसायिक कार्यक्रमांसाठी पूर्णपणे बंद करावा, अशी मुख्य मागणी करण्यात आली आहे.या सर्व मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य, डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली दि. ०६ ऑक्टोबर २०२५ रोजी, सोमवार, सकाळी साडे ११ वाजता, छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथील महात्मा गांधी स्मारकासमोर ''सत्याग्रह आंदोलन'' करण्यात येणार आहे.या आंदोलनाची पूर्वसूचना व निवेदन नगरपरिषद प्रशासनाला सादर करण्यात आले असून, प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अन्यथा पुढील काळात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही डॉ. ढवळे यांनी दिला आहे.

# शिरूरकासार पूरग्रस्तांना द. सहारा एज्युकेशन अँड रिसर्च फाउंडेशनच्या वतीने मदतीचा हात

## शंभर किराणा किटचे वाटप

**तलवाडा । दिव्य रिपोर्टर**

अतिवृष्टी व सिंधफणा नदीला आलेल्या पुरामुळे घरांचे पूर्णपणे नुकसान झाले आहे. या पूरप्रकोपात नागरिकांचे भांडी, कपडे आणि इतर उपजीविकेच्या वस्तू वाहून गेल्या, ज्यामुळे अनेक कुटुंब उद्ध्वस्त झाली आहेत. या कठीण काळात द .साहारा एज्युकेशन अँड रिसर्च फाउंडेशनच्या वतीने संस्थापक अध्यक्ष हाजी जुबेर भाई पुढाकाराने पूरग्रस्त गरीब कुटुंबातील शिरूर कासार,व बृमनात येळम येथे शंभर गोरगरिबांना किराणा किटचे वाटप करण्यात आले



या गावांमध्ये पूरामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. हाजी जुबेर भाई नेहमी समाज कार्यामध्ये अग्रेसर असणारा एक नेतृत्व आहे. कोरोना काळात त्यांनी अनेक कुटुंबांना मदत केलेली आहे तर सदैव मदत कार्यांमध्ये तत्पर असतात त्यांच्या या समाजकार्यामुळे एक समाजात एकतेचा संदेश देण्यात येत आहे.जात-पात न पाहता अनेक संकटकाळी ते सर्वसामान्य माणसाचे कामे येणारा एक समाज सेवक म्हणून त्यांची ओळख आहे द.साहारा एज्युकेशन रिसर्च फाउंडेशन च्या माध्यमातून नेहमी ते मदतीचा हात देताना दिसत आहे. या वेळी मदत कार्यात शेख खदीर उर्फ खालू. शेख अजीम धन्ना. सय्यद शरीफ शेख शोएब शेख जोहेब. शेख जुनेद सय्यद इम्रान अबूबकर पठाण सय्यद आमेर शेख शफीक शेख. मोहसीन शेख नासेर शेख सलमान सय्यद सिद्दिक शेख सोनू नदीम शेख सैफ शेख समीर शेख जैद शेख शहेबाज शेख सोहेल शेख मुस्तकीम शेख मोहजीब इत्यादी समाजसेवक सहभागी झाले होते.

# नागरिकांनो, तणावमुक्त जीवन जगा - डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । दिव्य रिपोर्टर**

हल्ली ताणतणावयुक्त जीवनशैलीमुळे हृदयविकार होण्याची शक्यता वाढत आहे. हृदय हा शरीरातील सर्वात अनमोल अवयव आहे, त्याला क्षणाक्षणाला जपा, तणाव मुक्त, व्यसनमुक्त जीवन जगा.



धकाधकी व स्पर्धेच्या युगात आपले अस्तित्व जपताना विशीच्या आत हार्ट फेल होण्याचे प्रमाण वाढत आहे. शरीराला झेपेल असा व्यायाम करा, पायी चला, सायकल चालवा किंवा धावण्याची कसरतही तुमचे हृदय तंदुरुस्त ठेवेल, असा सल्ला तज्ज्ञ डॉक्टरांनी दिला.

संशोधनानुसार नियमित सायकलिंगमुळे हृदयविकाराचा धोका ५० टक्के पर्यंत कमी होऊ शकतो. ताण कमी होतो . सायकल चालवताना ताण-तणावाचे हार्मोन्स कमी होतात, ज्याचा हृदयावर चांगला परिणाम होतो. दीर्घायुष्य लाभते नियमित सायकलिंग करणाऱ्यांचा विश्रांतीतील हृदयाचा ठोका कमी असतो व हृदय अधिक मजबूत बनते

सायकलिंग हे हृदयाच्या आरोग्यासाठी सर्वोत्तम (कार्डिओ) व्यायामांपैकी एक आहे.मध्यम गतीने सायकल चालवल्यास उच्च रक्तदाब नियंत्रणात येतो व पक्षाघात/हृदयविकाराचा धोका कमी होतो. वाईट कोलेस्टेरॉल कमी व चांगले कोलेस्टेरॉल वाढते त्यामुळे रक्तवाहिन्या स्वच्छ राहतात व अडथळे कमी होतात. वजन नियंत्रणात राहते कॅलरीज जळतात व हृदयावरील भार कमी होतो. हृदयविकाराचा धोका कमी होतो.

सर्वांनी तणावरहित जीवन जगावे

अपयश आले तरी खचून न जागा ताणतणवापासून दूर रहा, हृदय तंदुरुस्त राखण्यासाठी शरीराची हालचाल सुरू ठेवणे गरजेचे आहे. जन्मजात हृदयात दोष असलेल्यांना हृदयविकाराचा धोका असला तरी वरून ठणठणीत वाटणारे अटॅकचा शिकार होत आहेत.असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट) न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले.

# बळीपणाच्या पलीकडे: यश व योगदानाच्या कथा

भारतीय मुस्लीम समाजाला मुख्य प्रवाहातील चर्चेत प्रामुख्याने बळी पडलेला व वंचित म्हणून दाखवले जाते. पण अलीकडच्या काही वर्षांत अशी अनेक यशकथा पुढे आल्या आहेत ज्या या एकांगी प्रतिमेला आव्हान देतात. विज्ञान, कला, व्यवसाय आणि क्रीडा या क्षेत्रांत भारतीय मुस्लीमांनी केलेली प्रगती त्यांच्या राष्ट्रनिर्माणातील भूमिकेला नवे परिमाण देते. हे दाखवते की हा समाज केवळ पीडित नाही, तर बदलत्या संरचनात्मक संधींचा लाभ घेत सर्वोच्च पातळीवर योगदान देणारा आहे.

स्वातंत्र्योत्तर सुरुवातीच्या दशकांत भारतीय मुस्लीमांनी संशोधन व शैक्षणिक क्षेत्रांत योगदान देऊन देशाची वैज्ञानिक क्षमता उभारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. ही परंपरा पुढे चालू आहे. उदाहरणार्थ, शांती स्वरूप भटनागर पुरस्कार प्राप्त डॉ. शाहिद जमील यांनी कोविड काळात भारताच्या ड-ठड-उेत-२ जीनोम सिक्वेन्सिंग संघटना (खछड-उजत्र्) चे नेतृत्व केले. शैक्षणिक नेतृत्वात मुस्लीम महिलांची प्रगतीही उल्लेखनीय आहे. प्रा. नजमा अख्तर या जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठाच्या पहिल्या महिला कुलगुरू झाल्या आणि त्यांना २०२२ मध्ये पद्मश्री पुरस्कार, तसेच २०२३ मध्ये सन्माननीय कर्नल कमांडंट पद मिळाले. त्याच काळात प्रा. नईमा खातून या अलीगड मुस्लिम विद्यापीठाच्या १२३ वर्षांच्या इतिहासातील पहिल्या महिला कुलगुरू झाल्या. अशा घडामोडी समावेशकतेकडे होणाऱ्या संस्थात्मक बदलांचे प्रतीक आहेत. याच काळात मुस्लीम समाजातील शैक्षणिक प्रगतीही लक्षणीय आहे - २०२३-२४ मध्ये मुस्लीमांचा साक्षरतेचा दर ७९.५% झाला असून तो जवळपास राष्ट्रीय सरासरीला गाठतो आहे. तसेच मुस्लीम महिलांचा कामगार सहभाग फक्त दोन वर्षांत १५% वरून २१.४% झाला आहे. या सुधारणांनी दाखवले की शिक्षण व संधींच्या उपलब्धतेमुळे समाज ऐतिहासिक अडथळ्यांवर मात करत आहे.

व्यवसाय व उद्योजकतेच्या क्षेत्रातही मुस्लीम समाजाची ठळक छाप आहे. विप्रोचे संस्थापक अझीम प्रेमजी हे केवळ दिग्गज उद्योजक नसून देशातील अग्रगण्य परोपकारी आहेत. २०२३ मध्ये त्यांनी १,७७४ कोटी दान केले, जे मागील वर्षाच्या तुलनेत २६७% अधिक होते. हाबील खोराकीवाला यांनी वॉकहार्ट या औषध कंपनीची स्थापना करून आशियात पहिल्यांदा मानवी इन्सुलिनचे उत्पादन केले. इरफान रझाक यांच्या प्रेस्टिज ग्रुपने भारतातील दुसऱ्या क्रमांकाचा रिअल इस्टेट डेव्हलपर म्हणून स्थान मिळवले. महिला उद्योजकांत शहनाज हुसैन यांनी भारतातील हर्बल ब्युटी उद्योगाची पायाभरणी करून ते ४०० पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय फ्रँचायझपर्यंत पोहोचवले. या यशकथांनी दाखवले की मुस्लीम समाज आर्थिक विकास, रोजगारनिर्मिती व सामाजिक प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

संस्कृतीच्या क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिसून येते. २०२३ मध्ये प्रदर्शित झालेला शाहरुख खानचा पठाण हा चित्रपट विक्रमी यशस्वी ठरला. काही गटांच्या बहिष्काराच्या हाकांना न जुमानता या चित्रपटाने १०० दशलक्षांहून अधिक कमाई केली. हे यश भारताच्या समावेशकतेचे प्रतीक ठरले. तबलावादक उस्ताद जाकीर हुसेन यांना संगीत क्षेत्रातील असामान्य कार्यासाठी २०२३ मध्ये पद्मविभूषण मिळाले. चित्रपटसृष्टी असो वा शास्त्रीय संगीत, मुस्लीम कलाकारांनी भारतीय सांस्कृतिक जीवन समृद्ध केले आहे.क्रीडा क्षेत्रात तर मुस्लीम खेळाडूंनी देशाला अनेक अभिमानाचे क्षण दिले आहेत. आशिया कप २०२३च्या अंतिम सामन्यात मोहम्मद सिराजने ६ गडी बाद करून भारताला विजेतेपद मिळवून दिले आणि आपले बक्षीस मेहनती मैदान कामगारांना दान केले. त्याच वर्षी विश्वचषकात मोहम्मद शमी हा २४ बळींसह सर्वाधिक गडी बाद करणारा खेळाडू ठरला. महिलांत सानिया मिर्झा या ग्रँडस्लॅम विजेत्या टेनिसपटूने २०२३ मध्ये निवृत्ती घेतली, पण असंख्य तरुणींना क्रीडाक्षेत्राकडे प्रेरित केले. घोडेस्वारीत फुवाद मिर्झा या खेळाडूने ऑलिंपिकसाठी पात्र ठरून ऐतिहासिक यश मिळवले.

ही सर्व उदाहरणे दाखवतात की मुस्लीम समाजाची ओळख केवळ वंचितपणावर आधारित नाही, तर यश आणि योगदानावरही आधारित आहे. शिक्षणाची वाढ, समावेशकतेकडे संस्थात्मक बदल, आणि गुणवत्तेच्या आधारावर मिळणारे राष्ट्रीय सन्मान यामुळे अधिकाधिक मुस्लीम विविध क्षेत्रांत पुढे येत आहेत. आव्हाने अजूनही आहेत, पण अलीकडच्या दोन वर्षांच्या यशामुळे हळूहळू पूर्वग्रह दूर होत आहेत. आज भारतीय मुस्लीम हे क्षेपणास्त्र शास्त्रज्ञ, कुलगुरू, साहित्यिक, उद्योजक, चित्रपट तारे आणि क्रिकेटपटू म्हणून देशाच्या घडणीत सक्रिय आहेत. माध्यमे आणि संस्था त्यांना भारताच्या यशोगाथेतले समान भागीदार म्हणून मांडू लागली आहेत.

**अल्ताफ मीर, पीएच.डी.**
**जामिया मिलिया इस्लामिया**

# यश ढाका हत्याप्रकरणातील सर्व आरोपींना कठोर शिक्षेसाठी प्रयत्न करणार - धनंजय मुंडे

**बीड । दिव्य रिपोर्टर**

बीड येथील पत्रकार देवेंद्र ढाका यांच्या यश नामक २२ वर्षीय तरुण मुलाची बीड शहरात काही दिवसांपूर्वी दिवसाढवळ्या एका टोळक्याकडून निर्घृण हत्या करण्यात आली होती. आज माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी बीड शहरातील ढाका कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

स्वर्गीय यश ढाका या उमद्या तरुणाची बीड शहरातील गजबजलेल्या माने कॉम्प्लेक्स भागात दिवसाढवळ्या हत्या करण्यात आली होती. या प्रकरणाचे व्हिडीओ सुद्धा व्हायरल झाले होते. अल्पसंख्यांक मागासवर्गीय समाज असलेल्या वाल्मिकी समाजातील देवेंद्र ढाका व त्यांच्या परिवारावर यामुळे दु:खाचा डोंगर कोसळला असून, ढाका कुटुंबीय न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. स्वर्गीय यश




ढाका याच्या सर्व मारेकऱ्यांना कठोरात कठोर शिक्षा केली जावी यासाठी आपण वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा केली असून, तुमच्या या लढाईत तुम्ही स्वत:ला एकटे समजू नका, कुणालाही घाबरू नका, मी न्यायाच्या या लढाईत तुमच्या पूर्ण शक्तीने पाठीशी उभा आहे असे धनंजय मुंडे यांनी यश ढाका च्या आई वडिलांशी बोलताना म्हटले. यावेळी पत्रकार देवेंद्र ढाका व त्यांच्या कुटुंबीयांच्या भावना अनावर झाल्याचे पाहायला मिळाले.

दरम्यान या प्रकरणात पोलिसांकडून केल्या जात असलेल्या तपासाची धनंजय मुंडे यांनी पोलीस अधीक्षकांची चर्चा करून माहिती घेतली असून याबाबत आपण राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्याशी चर्चा करणार असून, यशच्या कुणाच्या कटात सहभागी असलेल्या कुणालाही सोडले जाणार नाही, असे धनंजय मुंडे म्हणाले, यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, ॲड. गोविंदराव फड, प्रदेश प्रवक्ते भागवत तावरे, अविनाश नाईकवाडे, विनोद हतांगळे, यांच्यासह ढाका कुटुंबीय व नातेवाईक आदी उपस्थित होते.

# यश ढाका खून प्रकरण : ॲड. प्रकाश आंबेडकरांची ढाका कुटुंबियांसोबत भेट

**बीड । दिव्य रिपोर्टर**

स्व. यश देवेंद्र ढाका खून प्रकरणात पोलिस प्रशासनाने आतापर्यंत तीन आरोपींना अटक केली असली तरी दोन आरोपी अद्याप मोकाट फिरत आहेत. या गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर आज (दि. २ ऑक्टोबर २०२५) छत्रपती संभाजीनगर येथे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांची भेट घेण्यात आली.



ढाका प्रकरणाची संपूर्ण माहिती त्यांना देण्यात आली. त्यानंतर ॲड. आंबेडकर यांनी तातडीने वकिलांशी तसेच समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त मा. प्रदीप भोगले व संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली. पीडित कुटुंबाला न्याय मिळावा यासाठी योग्य कायदेशीर मार्गदर्शन व आवश्यक प्रयत्न करण्याचे त्यांनी निर्देश दिले.

या प्रसंगी त्यांनी ढाका कुटुंबियांचे सांत्वन करत त्यांच्या सोबत खंबीरपणे उभे राहण्याची ग्वाही दिली.या भेटीला ढाका कुटुंब, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, अमरसिंग ढाका, ज्येष्ठ नेते डॉ. नितीन सोनवणे, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर, पुरुषोत्तम उर्फ गोटू वीर, शहराध्यक्ष लखन जोगदंड यांच्यासह वाल्मिकी समाजाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ढाका प्रकरणात न्याय मिळवण्यासाठीचा लढा सुरू असून तो शेवटच्या टप्प्यापर्यंत लढला जाईल, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## माजलगाव येथील बालाजी मंदिरात ब्रह्मोत्सवास प्रारंभ

# व्यंकट रामन गोविंद नामाने माजलगाव शहर दणाणून गेले

**माजलगाव । दिव्य रिपोर्टर**

शहरातील बालाजी मंदिर येथे (ता. ४ ते ६ ऑक्टोबर) दरम्यान ब्रह्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. (ता. ४) शनिवारी शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या यात्रेत बाल वारकऱ्यांनी सादर केलेल्या नृत्याने लक्ष वेधले.

बालाजी मंदिर सेवा फाऊंडेशन, माजलगावच्या वतीने व्यंकटेश बालाजी श्री.सहस्त्र कलशाभिषेक विधी चे आयोजन करण्यात आले आहे. हवन विधी चे यजमान उज्वल शिवप्रसाद भुतडा हे असून श्री.गणपती पुजन, देवता स्थापन, अग्नी स्थापन, ग्रहयज्ञ व सहस्त्र कलशासादन अर्चन इत्यादी पूजन



होणार आहे. शनिवार झेंडा चौक ते शिवाजी महाराज चौक ते बालाजी मंदिर येथून शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत समाज बांधव व महिला भगिनीं, भाविक भक्त उपस्थित होत्या. चिमुकल्या वारकऱ्यांनी व बालाजी भगवानच्या पालखीने लक्ष वेधले होते. फुगडी खळेत भक्तांनी आनंद व्यक्त केला. (या.५)

रविवार ब्रम्होत्सवा व श्री.सहस्त्र कलशाभिषेक विधी दुतीय दिवस १००० महिला द्वारे विष्णुसहस्त्रनाम व्यंकटेश स्तोत्र चे वाचन होईल. (ता.६)सोमवार महाआरती व ब्रम्होत्सव व श्री.सहस्त्र कलशाभिषेक विधी तृतीय दिवस १००० महिला च्या वतीने विष्णूसहस्त्रनाम व व्यंकटेश स्तोत्र चे वाचन कोजागिरी पौर्णिमा, त्रिशोपचार महापूजन, ध्वजारोहण, नैवेद्य, महाआरती श्री महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे.

महाप्रसादाचे यजमान रामस्वरूप खंडेलवाल व कारभारी काळे हे आहेत. याचा लाभ घ्यावा असे आवाहन बालाजी सेवा संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

# दिवाळीनंतर दोन दिवसात आचारसंहिता

## शेवटी महानगरपालिका निवडणुका होतील; चंद्रकांत पाटील

**मुंबई । दिव्य रिपोर्टर**

लोकसभा, विधानसभेपेक्षा नेत्याची खरी निवडणूक ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, महापालिका असते. लोकशाहीमधील सर्वात महत्त्वाची ही निवडणूक आहे. कदाचित आज (४ ऑक्टोबर) संध्याकाळपर्यंत जिल्हा परिषद निवडणुकीची घोषणा होईल. आता कुणीतरी म्हणतील निवडणूक आयोगाशी दादांची चर्चा झाली वाटतं. मी ४० वर्षे यामध्ये घालवली त्यामुळे मी अंदाज मांडला आहे. दिवाळीनंतर दोन दिवसात आचारसंहिता जाहीर होईल, त्यामुळे आपण निवडणुकीच्या तयारीला लागूया, असे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे. आज भाजपचा विजयी संकल्प मेळावा पार पडला.



या मेळाव्यात चंद्रकांत पाटील यांनी निवडणुकीसाठी कानमंत्र दिला.

निवडणूक महायुती म्हणून लढवायची आहे

चंद्रकांत पाटील म्हणाले की, २०१९ साली ज्यांचे तिकीट नाकारले त्या बावनकुळे यांना २०२४ च्या विधानसभा निवडणुकीचे उमेदवार ठरवण्याचे अधिकार मिळाले.निवडणूक ही फास्ट ट्रेन प्रमाणे आहे, प्लॅटफार्मवर जो राहील तो राहील. मात्र, नाराज होऊ नका. राजकारणात प्रयत्नाबरोबर नशीब देखील लागतं. महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये मोठा फरक असला पाहिजे. २०१७ ची परिस्थिती बदला, त्यासाठी येणाऱ्या दिवाळीचा फायदा करून घ्या. लोकांना भेटून संपर्क वाढवा. निवडणूक महायुती म्हणून लढवायची आहे मात्र शेवटच्या क्षणी कोणता निर्णय घ्यायचा हे वरिष्ठ नेते ठरवतील, असे ते म्हणाले. आमच्या कोणत्याही कार्यकर्त्यावर अन्याय होऊ देणार नाही, असे ते म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना मागत असलेल्या ठिकाणी आपला चांगला उमेदवार असेल तर मैत्रीत लढू, पण कार्यकर्त्यांचा बळी दिला जाईल असं लढणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

# माने कॉम्प्लेक्स समोरील चौकास महात्मा गांधी चौक नाव द्या-डॉ.संजय तांदळे

**बीड । दिव्य रिपोर्टर**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त दि.०२.१०.२०२५ गुरुवार रोजी बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेच्या वतीने छत्रपती संभाजीराजे क्रीडांगणा वरील राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करुन महात्मा गांधी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून शहरातील माने कॉम्प्लेक्स समोरील त्रिवेणी मार्गावरील चौकास महात्मा गांधी चौक असे नामकरण करण्यात यावे अशी मागणी जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेच्या वतीने नगर परिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांना दि. ३ ऑक्टोबर २०२५ रोजी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. माने कॉम्प्लेक्स चौकातील गांधीजींच्या विचारांचे प्रतीक असलेल्या माकडांची अज्ञात व्यक्तीने तोडफोड केल्याने सामाजिक कार्यकर्ता संघटनेच्या मागणीची दखल घेऊन नगर परिषदेच्या तत्कालीन मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी दि. २ ऑक्टोबर २०२३ रोजी माकडांच्या नवीन प्रतिकृतीची स्थापना केली होती. महात्मा गांधी चौक



नामकरण बाबत दि.३० सप्टेंबर २०२४ रोजी बीड नगर परिषदेच्या तत्कालीन मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्या समवेत झालेल्या बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेच्या बैठकीत लवकरच नामकरण बाबतचा निर्णय घेण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी त्यावेळी दिली होती. माने कॉम्प्लेक्स समोरी त्रिवेणी मार्गावरील चौकास महात्मा गांधी चौक नाव द्या या मागणी सह अंकुश नगर मधील रोड चे काम त्वरित करण्यात यावे, अंकुश नगर रस्त्यावरील मुख्य पाणीपुरवठा पाईपलाईनचे वाढीव क्षमतेचे नव्याने पाणीपुरवठा पाईपलाईनचे काम करण्यात यावे, आगलावे परिसरात पथदिवे बसवण्यात यावेत, आगलावे इस्टेट कृष्णाई नगर मधील नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी मोठी पाईप लाईन टाकण्यात यावी, संत भगवान बाबा इंग्लिश स्कूल एरिया, संत वामन भाऊ नगर ,आगलावे इस्टेट , कृष्णाई नगर आदी भागामध्ये घंटा गाडीची सोय करण्यात यावी आदी मागण्या नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केल्या आहेत.यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ.संजय तांदळे, सुदाम कोळेकर, संजय नवले, एस.एम.युसुफ,लक्ष्मण चाटे , रामधन जमाले, नवनाथ नाईकवाडे आदींची उपस्थिती होती.

# नवीन मच्छिंद्रनाथ मंदिराचा शीलारोहन कार्यक्रम

## नाथ भक्तांनी सढळ हाताने मदत करण्याचे आ.सुरेश धस यांचे आवाहन

**आष्टी । दिव्य रिपोर्टर**

साडेतीन मुहूर्तांपैकी अत्यंत मंगल असलेल्या विजयादशमीच्या मुहूर्तावर श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथगड मायंबा येथील नवीन दगडी मंदिर बांधकामाच्या शीला रोहनाचा शुभारंभ देवस्थानचे विश्वस्त आ. सुरेश धस यांचे हस्ते करण्यात आला.

या वेळी मदन महाराज देवस्थानचे अध्यक्ष हरिभक्त परायण बबन महाराज भैरवाल मच्छिंद्रनाथ देवस्थानचे अध्यक्ष सचिव विश्वस्त माजी आमदार साहेबराव दरेकर, अ.भा.किसान संघाचे नीलेश चिपाडे,विश्वस्त ताठे आदि उपस्थित होते.. या नियोजित भव्य दिव्य नाथ समाधी मंदिराचे बांधकाम देगलूर परिसरातील उच्च दर्जाचा दगड वापरण्यात येणार आहे .. हा शीलारोहनाचा कार्यक्रम संत,महंतांच्या उपस्थितीत संपन्न झाला..

यावेळी दानशूर नाथ भाविक भक्तांनी या मंदिराच्या कामासाठी सढळ हाताने



मदत करण्याचे आवाहन आ.सुरेश धस यांनी केले आहे.

यावेळी बोलताना आ.धस यांनी या मंदिर बांधकामाचा अपेक्षित कालावधी साडेतीन वर्ष एवढा असून या संपूर्ण दगडी बांधकाम असलेल्या मंदिराच्या उभारणीसाठी सुमारे ७२ कोटी रूपये इतका खर्च अपेक्षित असून मंदिरासाठी लागणारे दगड देगलूरहुन आणले जात असल्याचे सांगितले.त्याला घडवणे व बसविणे याची किंमत गृहीत धरून या शिलेचा आकार आणि किंमत वेगळी राहणार असून भाविक भक्तांनी या प्रति शीला संख्या निश्चित करून आपला सहभाग नोंदवावा याविषयीची अधिक माहिती लवकरच जाहीर करण्यात येईल असे सांगत आत्तापर्यंत काही भक्तांनी हजारो सिमेंटच्या गोण्या, तर काहींनी लाखो रुपयांची देणगी देऊन सहकार्य केले आहे केले आहे. या मंदिराचा पाया १००१५० फूट एवढा असून, १०९ फूट उंच कळसावर नाथ संप्रदायाचा भगवा ध्वज फडकणार असून या कामासाठी नाथभक्तांनी सढळ हाताने मदत करण्याचे आवाहन सुरेश धस यांनी केले आहे.

# स्व.काकूंचे जीवन परोपकारासाठीच - रामायणाचार्य रामराव ढोक महाराज

## आम्ही स्व.काकूंचे वारसदार असल्याचा अभिमान वाटतो - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड । दिव्य रिपोर्टर**


जिल्ह्यातील आदराचे स्थान म्हणून स्व.काकूंकडे पाहिले जाते त्यांना अभिवादन करण्यासाठी एवढा मोठा चाहता वर्ग उपस्थित राहतो हेच काकूंच्या कार्याची पावती आहे. अशा लोकनेत्या स्व.काकूंचा कधीही विसर पडू नये असे प्रतिपादन रामायणाचार्य ह.भ.प. ढोक महाराज यांनी केले तर स्व.काकूंचे आम्ही वारसदार असल्याचा अभिमान वाटतो, काकू सारख्या कर्तबगार महिलेने शून्यातून विश्व निर्माण केल्याची प्रेरणा घेण्यासारखी असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

शनिवार दिनांक ४ ऑक्टोबर रोजी माजी खासदार स्व.केशरकाकू सोनाजीराव क्षीरसागर यांच्या १९ व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याचवेळी प्रसिद्ध





कीर्तनकार रामायणाचार्य रामराव ढोक महाराज यांच्या कीर्तनाचेही आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम क्षीरसागर कुटुंबीयांच्या वतीने काकूंना अभिवादन करण्यात आले त्यानंतर भरगच्च भरलेल्या मैदानात कीर्तनाला प्रारंभ झाला. यावेळी किर्तन सांगताना रामायणाचार्य ढोक महाराज म्हणाले की, माय गेली बाप गेला आता सांभाळी विठ्ठला या संत जनाबाईंचा अभंग घेत ते म्हणाले की, बीड जिल्ह्यातील आदराचे स्थान म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते त्या स्व.काकू च्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी मोठा चाहता वर्ग उपस्थित असतो. एवढ्या मोठ्या कार्यक्रमात कुठलीही कसर न करता योग्य आणि सुंदर नियोजन करून हा स्मृती सोहळा साजरा होत असतो. पुण्याचा संचय करतो तो पुण्य आत्मा असतो परोपकार हेच पुण्य असते तसे काकूंचे काम होते. हजारो परिवारांना आधार देणारी परोपकारी महिला म्हणून काकूंचा आदर्श घेण्यासारखा आहे. संपूर्ण आयुष्य त्यांनी परोपकारी म्हणून जगले. जगातले सर्वात मोठे तीर्थक्षेत्र म्हणजे आई आणि वडील आहेत आधी त्यांची सेवा करा बाकीचे पुण्य आपोआप पदरात पडेल. तीर्थालाही पवित्र करणारी सेवा म्हणजे माता-पित्याची सेवा आहे. भक्त पुंडलिकाच्या भक्तीला भारावून जगाचा बाप आजही पंढरपुरात उभा आहे हे माता-पित्यांचे प्रेम आज जगाला प्रेरणा देणारे आहे. जेव्हा चांगले दिवस येतात तेव्हा आईबाप जिवंत नसतात ज्यांचे आहेत ते भाग्यवान आहेत पण काही कारटे आपल्या आई बापाला वाऱ्यावर सोडून देतात जन्मदात्याच्या आनंदात जो आपला आनंद शोधतो त्याला देवाची सेवा करण्याची गरज नाही, आई-वडिलांचा आशीर्वाद आणि आनंद आयुष्यभर पुरतो त्यामुळे रडायचं असेल तर देवाजवळ रडा माणसा पुढे रडू नका देव मार्ग काढतो पण माणूस तुमची फुकटची प्रसिद्धी करतो जोपर्यंत जिवात जीव आहे तोपर्यंतच मनुष्याला किंमत असते त्यामुळे चांगले कर्म केले तर नाव होईल आणि कुकर्म केले तर बरं झालं हे गेलं अशी वाक्य ऐकायला येतील त्यामुळे परोपकारी जीवन जगून सदाचारी व्हा असे ते म्हणाले.



# बिंदुसरा नदीपात्रात पुन्हा कचरा!

## नगरपालिकेची स्वच्छता मोहीम म्हणजे नव्याचे नऊ दिवस

**बीड । दिव्य रिपोर्टर**

बीड शहराच्या मध्यातून वाहणारी बिंदुसरा नदी गेल्या ४० वर्षांनंतर पहिल्यांदाच यावर्षी नीट स्वच्छ करण्यात आली. लाखो रुपये खर्च करून प्रशासनाने राबवलेल्या या मोहिमेमुळे नदीचे सौंदर्य खुललेच नाही, तर नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीत आलेल्या पुरानेही शहराला कोणतीही मोठी हानी झाली नाही. याबद्दल बीडकरांनी त्या वेळी प्रशासनाचे मनापासून कौतुक केले होते.

मात्र हे कौतुक जास्त काळ टिकले नाही. आज पुन्हा नदीपात्रात कचऱ्याचे साम्राज्य पसरले असून प्रशासनाची बेफिकिरी उघड झाली आहे.नदीपात्रात केलेली स्वच्छता मोहीम ही कायमस्वरूपी उपक्रम न ठरता नव्याचे नऊ दिवस ठरल्याचे वास्तव आता जनतेसमोर आहे. जेव्हा स्वच्छतेमुळे शहर वाचले, तेव्हा कौतुक झाले; पण सातत्य न राखल्याने प्रशासन पुन्हा जनतेच्या रोषाचा धनी ठरत आहे.

समाजसेवक रामनाथ खोड यांनी प्रशासनावर सडकून टीका करताना म्हटले. पालकमंत्र्यांच्या आगमनाच्या आधी जर नदीपात्र रस्ते साफ होत स्वच्छ होत असेल, तर पालकमंत्र्यांनी रोज बीडला यावे. मग कदाचित स्वच्छतेला सातत्य लाभेल.४० वर्षांनंतरची पहिली स्वच्छता गाजली होती, पण लाखो रुपये खर्च करुन केलेल्या बिंदूसरेची अवस्था पुन्हा शहराची आत्मा पुन्हा घाबरलेली आहे; बिंदुसरा फक्त पाण्याची नाही, प्रशासनाची परीक्षा आहे!

# मुलींचा जन्मदर रेशो घसरला जिल्ह्याची भयान अवस्था

**पोर्टेबल सोनोग्राफी यंत्राची खरेदी करणाऱ्यांची चौकशी करण्याची गरज**




**जिल्हा प्रशासन व आरोग्य प्रशासनाने जिल्ह्यातील खासगी व सरकारी सोनोग्राफी केंद्र तपासणी मोहीम राबविणे अत्यंत गरजेचे**

**नवीन सोनोग्राफी यंत्रात लिंगनिदान करण्याचे फंक्शन ब्लर करण्यात आलेले म्हणून जुन्या सोनोग्राफी यंत्राचा वापर होत असल्याचा संशय**

गर्भवती मातेच्या जिल्हा रुग्णालयातील सोनोग्राफी अहवालात व खासगी सोनोग्राफी केंद्रातील अहवालात तफावत येत असल्याचा संशय, या मागील रहस्य काय?


दिव्य आधार


सोमवार, दि. ६ ऑक्टोबर २०२५ (पान-४)


## २०२२ ते २०२५ या चार वर्षात दरवर्षी मुलीच्या जन्मदरात झाली घसरण




**एकीकडे जिल्हा रुग्णालयातील काही स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टरांवर दबाव टाकून सेकंड ट्राईमेस्टर अबॉर्शन करून घेतल्याची तक्रार, या तक्रारी अर्जाची एसआयटीमार्फत चौकशी करण्याची गरज, जिल्हा रुग्णालय प्रशासनाने या गंभीर तक्रारीकडे विशेष लक्ष देण्याची गरज**

**जिल्ह्यात किती सोनोग्राफी सेंटर? जिल्ह्यातील सोनोग्राफी सेंटरच्या तपासण्या कधी झाल्या होत्या? सोनोग्राफी सेंटर तपासण्यासाठी पथक तयार केलेले आहे का? मागील चार वर्षात सोनोग्राफी सेंटर तपासणी करून पथकाने काय अहवाल दिला? याचा जिल्हाधिकारी यांनी आढावा घेण्याची गरज**



### माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी केले दिव्य आधारचे अवलोकन

सेकंट टाइमेस्टर अबॉर्शन या मथळ्याखाली दिव्य आधारने सोमवार, दि.२९ सप्टेंबरच्या अंकात ग्राऊंड रिपोर्टींगच्या माध्यमातून मोठी पोलखोल केली. सदरील वृत्त प्रकाशित झाल्यानंतर माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिव्य आधार वृत्तपत्रातील ग्राऊंड रिपोर्टींगचे अवलोकन करून अबॉर्शन संदर्भात चिंता व्यक्त केली. छायाचित्रात माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे दिव्य आधारच्या ग्राऊंड रिपोर्टींगचे अवलोकन करताना दिसत आहेत.

### जिल्हा रुग्णालयातून पुरावे नष्ट करण्याचे षडयंत्र सुरू असल्याची शंका

जिल्हा रुग्णालयातील काही स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टरांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे दिलेल्या तक्रारीत म्हटले की, जिल्हा रुग्णालयातील काही वरिष्ठ डॉक्टर सेकंड ट्राइमेस्टर अबॉर्शन करण्यासाठी दबाव टाकत आहेत. तसेच रुग्णांची सोनोग्राफी करण्यासाठी एका विशेष खासगी सोनोग्राफी सेंटरवर पाठविण्यासाठीही डॉक्टरांवर दबाव आहे. सदरील तक्रारीची चौकशी सुरू असून त्यामागचे सत्य काय? हे लवकरच चौकशीअंती समोर येईलच. परंतु या दरम्यान जिल्हा रुग्णालयातून खासगी सोनोग्राफी सेंटरवर केलेल्या सोनोग्राफी अहवाल नष्ट करण्याचे षडयंत्र सुरू असल्याची शंका असून जिल्हाधिकारी यांनी तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने या प्रकरणाची चौकशीसाठी स्वतंत्र पथक स्थापन करावे किंवा या प्रकरणाची चौकशी एसआयटीमार्फत करावी अशी जनतेतून मागणी होत आहे.

### जुन्या सोनोग्राफी यंत्राचा वापर होत असल्याची चर्चा

सध्या नवीन सोनोग्राफी यंत्रात आरोग्य प्रशासनाने लिंग तपासणी फंक्शनला ब्लर केलेले आहे. जर लिंग तपासणी केली तर त्याचे पिक्चर ब्लर दिसून येते. त्यामुळे लिंगनिदान होणे शक्य नाही. परंतु काही सोनोग्राफी सेंटरवर जुन्या सोनोग्राफी यंत्राचा वापर होत असल्याची जोरात चर्चा असून जर जुन्या सोनोग्राफी यंत्रातून लिंगनिदान केले तरच बाळाचे लिंग समजून येईल. म्हणून जुन्या यंत्राचा वापर होत आहे का? याचाही आढावा घेणे गरजेचे असून त्याशिवाय चायनामेड पोर्टेबल सोनोग्राफी यंत्र वापरले जातात का? याचीही चौकशी करणे गरजेचे वाटते. काही महिन्यांपूर्वी गेवराई तालुक्यात गर्भपात दरम्यान एका महिलेचा मृत्यू झाला होता. त्या महिलेची सोनोग्राफीसाठी पोर्टेबल चायनामेड सोनोग्राफी यंत्राचा वापर झाल्याचे दिसून आले होते. त्याअनुषंगाने पोर्टेबल सोनोग्राफी यंत्रावर नजर ठेवण्याची अत्यंत गरज आहे.

**सन २०२१-२२ या वर्षी हजार मुलामागे ९३७ असा मुलीचा जन्मदर होता, त्यात थोडीफार घसरण झाली आणि सन २०२२-२३ या वर्षी ९२९ असा मुलीचा जन्मदर झाला, त्यानंतर मात्र मुलीच्या जन्मदरात मोठी घसरण झाली व सन २०२३-२४ या वर्षी मुलीचा जन्मदर ८९६ वर आला आणि २०२४-२५ यावर्षी मात्र मुलीच्या जन्मदरात मोठी घसरण झाली, मुलीचा जन्मदर ८६१ वर येवून ठेपला, विशेष म्हणजे २०२१-२२ या वर्षानंतर मुलीच्या जन्मदरात वाढ झालीच नाही**

**लिंगनिदान संदर्भात आरोग्य प्रशासन, रुग्णालय प्रशासन व जिल्हा प्रशासनाला अत्यंत दक्ष राहण्याची गरज, काही तज्ज्ञ पोर्टेबल सोनोग्राफी मशिनद्वारे गर्भवती महिलांची चालत्या वाहनातून सोनोग्राफी करून लिंगनिदान करत असल्याचा संशय, त्यात गर्भवती महिलेला वाहनात बसवायचे आणि काही अंतरावर वाहन घेवून जावून परत आणायचे, अशाप्रकारे हा फंडा सुरू असल्याची शंका**

### सोनोग्राफी अहवालात छेडछाड होत असल्याचा संशय

एखादी गर्भवती महिला जिल्हा रुग्णालयात नियमाने गर्भपात करण्यासाठी आल्यानंतर त्या महिलेच्या तपासण्या केल्या जातात, नियमाने २४ आठवड्यापर्यंत जिल्हा रुग्णालयात गर्भपात करता येते परंतु २० आठवड्यापर्यंत नॉर्मल गर्भपात होतो. २० आठवड्याच्या पुढे काही ठोस कारण असेल तरच गर्भपात करतात. जसे बलात्कार पिडीत महिला किंवा गर्भातील बाळाला प्रॉब्लेम तसेच गर्भातील बाळामुळे महिलेला धोका अशा गंभीर कारणावरच २४ आठवड्यापर्यंत गर्भपात केले जाते. परंतु २० आठवड्यापर्यंत गर्भपात करण्याची जिल्हा रुग्णालयात तरतूद आहे. यात महत्त्वाचे म्हणजे जिल्हा रुग्णालयातील सोनोग्राफी अहवालात जर २१ आठवडे होत असतील तर त्या महिलेला एखाद्या खासगी सोनोग्राफी सेंटरवर पाठवून खासगी सोनोग्राफी केंद्राचा अहवाल मागवून घ्यायचा. त्यात १९ आठवडे ३ दिवस असे दाखवून जिल्हा रुग्णालयात गर्भपात करत असल्याचा संशय असून सोनोग्राफी अहवालात छेडछाड होत असल्याचीही चर्चा जोरात आहे. या दृष्टीकोनातूनही जिल्हा प्रशासनाने चौकशी करणे गरजेचे आहे. जर ज्या महिलांना गर्भपात करणे गरजेचे असेल त्यांचे गर्भपात नियमाने झाले असतील तर योग्य आहे.

बीड :

एकेकाळी बीड जिल्ह्यात मुलीच्या जन्मदरात मोठी घसरण झालेली होती. एका हजार मुलामागे ७०० मुली अशी बीड जिल्ह्यातील मुलीचा जन्मदर रेशो होता. या प्रकरणाला जिल्हा रुग्णालयाचे तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.गौरी राठोड यांनी गांभीर्याने लक्ष देवून मुलींचा जन्मदर रेशो कमी असल्याने या प्रकरणाला गांभीर्याने घेवून मुलीचा जन्मदर रेशो कमी असल्याचे कारण शोधण्यासाठी काठोकाठ प्रयत्न केले. यात स्त्रीभ्रूणहत्या होत असल्याचे दिसून आल्यानंतर त्यांनी स्वत:च्या जिवाची पर्वा न करता जिल्ह्यातील स्त्रीभ्रूणहत्या करणाऱ्या डॉक्टरांचा शोध घेवून मोठी कारवाई केली. यात अनेक डॉक्टर व सोनोग्राफी सेंटर कचाट्यात आले. हे प्रकरण राज्यभर गाजले. बीडच नव्हे तर राज्यातील सोनोग्राफी सेंटरच्या तपासण्या झाल्या. त्यानंतर मुलीचे जन्मदर वाढत गेले. एकंदरीत हजार मुलामागे ९०० मुली असा मुलीचा जन्मदर रेशो झाला. सर्व काही सुरळीत झाले होते. आरोग्य प्रशासनाने दबंग कारवाई करून स्त्रीभ्रूणहत्यावर लगाम लावला. त्यानंतर मुलीचा जन्मदर रेशो वाढत गेला. परंतु काही महिन्यांपूर्वी गेवराई तालुक्यात गर्भपात दरम्यान एका महिलेचा मृत्यू झाला. सदरील महिलेचे गर्भपात करणाऱ्यांवर कारवाई झाली. यात जालन्यातील एका डॉक्टरला ताब्यात घेतल्यानंतर त्या डॉक्टरकडे पोर्टेबल सोनोग्राफी यंत्र आढळून आले. पोर्टेबल सोनोग्राफी यंत्र चायनामेड असल्याचेही समोर आले. हे प्रकरण ताजे असतानाच जिल्हा रुग्णालयातील काही स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टरांनी थेट जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे तक्रार करून जिल्हा रुग्णालयात दबाव टाकून सेकंड ट्राईमेस्टर अबॉर्शन करून घेत असल्याचे तक्रारीत म्हटल्यानंतर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली. जिल्हा रुग्णालय प्रशासन या प्रकरणाची चौकशी करत असले तरी या प्रकरणाला गांभीर्याने घेवून रुग्णालय प्रशासनाने या प्रकरणाचा छडा लावण्याची गरज असून जर या प्रकरणी पारदर्शक चौकशी नाही झाली तर हे प्रकरण एसआयटीमार्फत तपासणी करणे गरजेचे झाले आहे. गेवराईतील गर्भपात दरम्यान महिलेचा मृत्यू त्यानंतर जिल्हा रुग्णालयातील काही स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टरांवर गर्भपातसाठी दबाव या सर्व बाबी अत्यंत गंभीर असल्याने याकडे दुर्लक्ष करणे योग्य ठरणार नाही. तसेच जिल्हा आरोग्य प्रशासनाच्या अहवालानुसार मुलीच्या जन्मदरातही घसरण झाल्याचे समोर आल्याने जिल्ह्यातील सोनोग्राफी सेंटरच्या तपासणी करणे आवश्यक झाले आहे. तसेच ज्या डॉक्टरांकडे पोर्टेबल सोनोग्राफी यंत्र आहे याचाही आढावा जिल्हा आरोग्य प्रशासन, जिल्हा रुग्णालय प्रशासन व जिल्हा प्रशासनाने घेणे गरजेचे असून मुलीच्या जन्मदर रेशोत घसरण का होत चालली? याचाही आढावा घेणे गरजेचे आहे.

जिल्हा आरोग्य प्रशासनाच्या अहवालानुसार मागील चार वर्षांचा मुलीचा जन्मदर रेशो पाहिला तर २०२१-२२ नंतर मुलीच्या जन्मदरात वाढ झालेली दिसूनच येत नाही. सन २०२१-२२ या वर्षी हजार मुलामागे ९३७ असा मुलीचा जन्मदर होता, त्यात थोडीफार घसरण झाली आणि सन २०२२-२३ या वर्षी ९२९ असा मुलीचा जन्मदर झाला, त्यानंतर मात्र मुलीच्या जन्मदरात मोठी घसरण झाली व सन २०२३-२४ या वर्षी मुलीचा जन्मदर ८९६ वर आला आणि २०२४-२५ यावर्षी मात्र मुलीच्या जन्मदरात मोठी घसरण झाली, मुलीचा जन्मदर ८६१ वर येवून ठेपला, विशेष म्हणजे २०२१-२२ या वर्षानंतर मुलीच्या जन्मदरात वाढ झालीच नाही. सन २०२४-२५ या सालात हजार मुलामागे ८६१ मुली असा जन्मदर असल्याने जन्मदरात मागील चार वर्षात घसरणच होत चाललेली दिसून येत आहे. एकेकाळी मुलीचा जन्मदर हजार मुलामागे ७०० मुली असा होता. त्यापेक्षा हा जन्मदर वाढलेला दिसून येत असला तरी सन २०२१-२२ या तुलनेत सन २०२४-२५ या वर्षी ७६ मुलीच्या जन्मदरात घट झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. मुलीच्या जन्मदरात घसरण का होत चालली? याचा प्रशासनाने आढावा घेण्याची गरज असून जर अशीच अवस्था राहिली तर मुलीचा जन्मदर पुन्हा हजार मुलामागे सातशे असा होवू नये यासाठी प्रशासनाने उपाययोजना करण्याची गरज आहे. जिल्ह्यात किती सोनोग्राफी सेंटर आहेत? या सोनोग्राफी सेंटरच्या तपासण्या कधी झाल्या होत्या? या सोनोग्राफी सेंटर तपासणीसाठी पथक स्थापन केलेले आहे का? जर पथक स्थापन आहे तर या पथकाने मागील चार वर्षात जिल्ह्यातील किती सोनोग्राफी सेंटरच्या तपासण्या करून त्याचा अहवाल जिल्हा आरोग्य प्रशासन व जिल्हा रुग्णालय प्रशासन यांच्याकडे दिला? सोनोग्राफी सेंटर तपासणी दरम्यान कोणत्याच सोनोग्राफी सेंटरमध्ये तफावत का आढळून आली नाही? असे अनेक प्रश्न या माध्यमातून उपस्थित झाले असून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी मुलीच्या जन्मदर रेशोत घसरण प्रकरणी विशेष लक्ष देण्याची गरज आहे. जिल्हा रुग्णालयातील काही स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टरांनी गर्भपातासाठी दबाव टाकत असल्याची तक्रारही केली आहे. त्या दृष्टीकोनातून त्या तक्रारी अर्जाची गांभीर्याने दखल घेवून जिल्हाधिकारी यांनी जातीने या तक्रारीकडे लक्ष देणे अपेक्षीत आहे.

## कपिलधारवाडीच्या ग्रामस्थांचे जीव धोक्यात तातडीने पुनर्वसन करा -आ.संदीप क्षीरसागर

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री, आपत्ती विभाग मंत्र्यांना दिले पत्र

**बीड । दिव्य रिपोर्टर**

मागील काही काळात सततच्या मुसळधार पावसामुळे व अतिवृष्टीमुळे कपिलधारवाडी येथे भूस्खलन झाले आहे. यामुळे गावकऱ्यांचा जीव धोक्यात असून त्यांचे तात्काळ पुनर्वसन करण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

मौजे पाली ग्रामपंचायत अंतर्गत कपिलधारवाडी छोटेसे ९० कुटुंबाचे गाव वास्तव्यास आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे वातीवृष्टीमुळे सदरील गाव अतिशय गंभीर संकटात सापडले आहे. या ठिकाणी झालेल्या अतिवृष्टीमुळे गावांमध्ये भूस्खलन सुरू झाले असून जमिनीत, डोंगराच्या कडेला, रस्त्यावर, शाळा खोली, घरे, मंदिरे, संरक्षण भिंत व इतर ठिकाणी मोठ्या भेगा व तडे गेले असून त्यात सातत्याने वाढ होत आहे. ग्रामस्थांना घरी जाणे धोकादायक झाल्याने ग्रामस्थांना, आबालवृद्धांना, महिला भगिनींना, शाळकरी विद्यार्थ्यांना, दिवस व रात्र आजच्या घडीला श्री. मन्मथ स्वामी देवस्थान, कपिलधार या ठिकाणी वास्तव्य करावी लागत आहे. त्यामुळे ग्रामस्थांना कायमस्वरूपी दिलासा देणे व तातडीने पुनर्वसन होणे आवश्यक आहे. यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. जसे की, १) कपिलधारवाडी गाव तातडीने धोकाग्रस्त क्षेत्र घोषित करावे २) प्रभावित सर्व कुटुंबाचे तातडीने स्थलांतर व पुनर्वसन व्यवस्था करावी ३) कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी नवीन जागा व निवासी योजना जाहीर करून तात्काळ अंमलबजावणी व्हावी ४) शाळा व सार्वजनिक इमारतीची सुरक्षा तपासून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची पर्यायी व्यवस्था करावी ५) या सर्व कामांसाठी आपत्ती निवारण निधी नरेगा व पुनर्वसन विभागाचा निधी तथा इतर योजनेमधून निधी मंजूर करून ग्रामस्थांना यथोचित सहकार्य व्हावे अशा विविध मागण्यांचे पत्र आ. संदीप क्षीरसागर यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री मा.ना.अजितदादा पवार, मदत व पुनर्वसन विभागाचे मंत्री मा.ना.मकरंद जाधव पाटील, आपत्ती विभाग मंत्री मा.ना.गिरीश महाजन यांच्यासह महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर, जिल्हाधिकारी, बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी जिल्हा आपत्ती व व्यवस्थापन, बीड, उपविभागीय अधिकारी बीड, तहसीलदार बीड, गटविकास अधिकारी पंचायत समिती बीड यांना पत्रव्यवहाराद्वारे केली आहे.



कपिलधारवाडी च्या ग्रामस्थांच्या निवासाची व भोजनाची व्यवस्था करावी

बीड विधानसभा मतदारसंघातील ग्रामपंचायत मौजे पाली अंतर्गत असलेले कपिलधारवाडी हे अंदाजे ९० कुटुंबांचे रहिवाशी गाव वसलेले आहे. सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने व यापूर्वी देखील संरक्षण भिंत,रस्ता व इतर व्यवस्थेला धोका निर्माण झाल्याने सन २०२२-२३ ते आजतागायत याविषयी आ. संदीप क्षीरसागर यांनी सातत्याने यथोचित पत्र व्यवहार व उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी करत आहेत. त्यातच ३० सप्टेंबर २०२५ रोजी रात्री उशिरा रस्ता,शाळा खोली, डोंगराचा काही भाग, घरांना मोठ्या प्रमाणात तडे जाण्याचे काम झाले आहे. त्या तळ्याचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. अशावेळी ग्रामस्थांना शासन व प्रशासन यांच्याकडून सर्वरित्या सहकार्य होणे गरजेचे असून याबाबत उचित कार्यवाही सुरू आहे. सर्व कुटुंबाची तात्पुरती व्यवस्था श्री. मन्मथ स्वामी देवस्थान, कपिलधार येथे होणे आवश्यक आहे. प्रशासनाने पंच कमिटी श्री. कपिलधार यांना याबाबतीत अवगत करावे. जेणेकरून पंच कमिटी कडून गावकऱ्यांना याबाबतीत यथोचित सहकार्य होईल व त्याचबरोबर ग्रामस्थांच्या हाताला काम, विद्यार्थ्यांना शाळा व भोजन व्यवस्था होईल. याबाबत प्रशासनाकडून आदेश काढण्यात यावेत.







हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शेख रिजवान खलील यांनी माऊली ऑफसेट माळीवेस, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे छापून साप्ताहिक दिव्य आधार कार्यालय बशीरगंज, जयहिंद प्लाझा, नगरपालिकेजवळ, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे प्रकाशित केले आहे. मो. ९५६१८४०१८४ या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही, वाद-विवाद बीड न्यायालय अंतर्गत.